## ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ११/०४/२०१०

### ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना
### सभा सूचना क्रमांक ०१, दिनांक ११/०४/२०१०

प्रति,
**सन्मा.श्री/श्रीमती---------------------------**
सदस्य / सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक २०/०४/२०१०** रोजी **सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०१, दि.११/०४/२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने.........**

**सही/-**
**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

### सभा सूचना क्र. ०१, दि.११/०४/२०१० ची विषयपत्रिका

### प्रश्नोत्तरे

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १. | ठाणे महानगरपालिकेच्या दि.१७/०२/२०१० व दि.०४/०३/२०१०रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत. |
| २. | ठाणे महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे दि.२१/०८/२००९ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत. |

..२/-

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| ३. | श्री.विजय मनोहर वैद्य, मुख्य अग्निशमन अधिकारी, मुख्य अग्निशमन विभाग यांना दि.३०/०४/२०१० रोजी मध्यान्होत्तर ऐच्छिक सेवानिवृत्ती देण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| ४. | डॉ.सुनिल पांडुरंग सावंत, वैद्यकीय अधिक्षक, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा यांना दि.३०/०४/२०१० रोजी मध्यान्होत्तर ऐच्छिक सेवानिवृत्ती देण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| ५. | घंटाळी प्रबोधिनी संस्था, घंटाळी ठाणे या संस्थेस घंटाळी देवी रंगमंच या वास्तुस मुदतवाढ देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| ६. | रायलादेवी प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.७७ मध्ये राममनोहर त्रिपाटी उद्यान येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| ७. | प्रभाग क्र.२९ समतानगर मधील सी.सी.रस्त्याच्या दोन्ही बाजूस १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी अंथरणे व समतानगर जलकुंभाचे इन्लेट ७०० मी.मी. व आऊटलेट ६०० मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| ८. | धर्मवीर आनंद दिघे ''जिद्द'' विशेष शाळेतील अस्थिव्यंग विभागातील माजी विद्यार्थीनी व मतिमंद विभागातील पालक यांचा गट तयार करुन ''जाणीव'' नावाची संस्था रजिस्टर केल्याबद्दल व त्यांना शाळेतील KIOSK चा वापर विनामूल्य करुन देणेबाबत. |

**सोबत :- अग्निशमन वाहनांचा गैरवापर टाळणेबाबत शासन परिपत्रक**
**१.क्रमांक अशस१४०८/४२९/नवि-२४ दि.१७/०४/२००७**
**२.क्रमांक अशस १४०८/१३४५/प्र.क्र.१७४०८-नवि-२४**
**दि.१७/०४/२००७.**
**सन्मा.सदस्यांचे माहितीसाठी.**

**सही/-**
**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ११/०४/२०१०

**<u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५ /०४/२०१०

## ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना
## सभा सुचना क्र. १, दिनांक ११/०४/२०१० बाबत पुरक घोषणा

प्रति,

**सन्मा.श्री./श्रीमती-------------------------**

सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेची **सर्वसाधारण सभा मंगळवार दि.२०/०४/२०१०** रोजी **सकाळी ११.३० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या "**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात**" सभा सुचना क्रमांक १, दिनांक ११/०४/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यासाठी बोलाविण्यांत आली आहे.

सदर सभेच्या खालील विषयांवर विचारविनिमय करण्यांत येईल अशी पुरक घोषणा याद्वारे करण्यांत येत आहे..

**<u>मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने............</u>**

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**<u>सभा सुचना क्र.१, दिनांक ११/०४/२०१० बाबत पुरक विषयपत्रिका</u>**

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| ९. | श्री.सुरेश क.बनसोडे, उप संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा विभाग (सेवा वर्ग-१) यांची ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन आदेश दि.१८/०३/२०१० अन्वये प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर. |
| १०. | श्री.अरविंद आकाशी, सहा.आयुक्त यांची ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत. |
| ११. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'मुख्य लेखा परिक्षक (वर्ग १) ' या संवर्गात निवड समितीने दिलेल्या गुणांप्रमाणे निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देणेबाबत. |
| १२. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागाकडे उप स्थानक अधिकारी (क्वालिफाईड)या पदासाठीच्या निवड यादीमधील उमेदवाराची नियमित वेतनश्रेणीमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये नियुक्ती करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| १३. | छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाकडे सद्यस्थितीत एकत्रित वेतनावर कार्यरत असलेल्या २० परिचारीकांना नियमित वेतनश्रेणीत सामावून घेणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |

...२/-

१४. श्री.भास्कर कोंडू पाटील, बिगारी, पाणी पुरवठा विभाग व श्री.बाळासाहेब वामन हिरे, अ-वर्ग लिपिक, करवसुली विभाग, उथळसर प्रभाग समिती यांचेविरुध्दचे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्हयात न्यायालयात अभियोग दाखल करणेस मंजुरी मिळणेबाबत.

१५. ठाणे शहरात ज्युपिटर हॉस्पिटललगतचे सुविधा भुखंडावरील प्रस्तावित तारांगण (प्लॅनेटोरियम) विकसित करणे व प्रकल्प वास्तू विशारद यांची नेमणूक करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१६. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) सह १५४ अन्वये शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार विद्यमान पेट्रोल/डिझेल/सि.एन.जी.इ.पंपाच्या विद्यमान वापर बदलावर निर्बंध आणणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

१७. स्थापत्य अभियांत्रिकी प्रयोगशाळेतील चाचण्यांसाठी आकारण्यांत येणा-या सुधारीत शुल्कास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१८. ठाणे महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाची नियमावलीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१९. ठाणे महानगरपालिका स्वच्छता आणि आरोग्य उपविधी २०१० बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

२०. मा.महासभा ठराव क्र.३७२ दि.४.२.२००९ मधील अ.क्र.१५ मध्ये अपंग असलेल्या व्यक्तींना स्टॉल उभारण्यासाठी लाभार्थीस रक्कम प्रत्येकी रु.२५,०००/- मात्र प्रमाणे अनुदान स्वरुपात खर्च करुन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने स्टॉल बांधून देण्याची तरतूद आहे. त्यामध्ये काही प्रमाणात बदल करुन अंध/अपंग लाभार्थींना स्वतःचे खर्चाने स्टॉल उभारणेसाठी अनुदान स्वरुपात रक्कम रु.२५,०००/- मात्र वितरण करणेस तसेच ज्या लाभार्थ्यांना पालिकेने स्टॉल पुरविले आहेत अशा लाभार्थीस बिज भांडवल म्हणून रक्कम रु.५०५०/- मात्र अनुदान स्वरुपात वितरण करणेच्या कार्यवाहीस/कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

२१. 'बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (B.O.T.)' या तत्वावर पादचारी पूल बांधणेबाबत धोरणात्मक निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर.

२२. प्रभाग क्र.४० मधील वैतीवाडी येथे २० सिटस्चे शौचालय बांधणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२३. गोखले रस्त्यावरील स्टेशन परिसरातील रस्ता रुंदीकरणात बाधीत असलेली धोकादायक झालेली रतन हाऊस इमारत तोडून त्या जागी डी.पी.नुसार रस्ता व गटार तयार करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

...३/-

२४. ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.०९ अंतर्गत घोडबंदर रस्ता ते प्रेस्टिज रेसिडंसी संकुलालगतच्या culvert पर्यंतच्या रस्त्याचे मध्य मार्गिकांचे (central lanes) चे डांबरीकरण करणेस मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२५. तुर्फेपाडा तलाव व त्या लगतच्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२६. प्रभाग क्र.८६ आनंदनगर सर्व्हीस रोडच्या पदपथाचे नुतनीकरण करणेस मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

२७. विटावा आर.यु.बी.जवळ मुंबई रेल्वे विकास प्राधिकरण (एम.आर.व्ही.सी.) यांचेमार्फत पाचव्या आणि सहाव्या लाईनचे कामाकरीता वापरल्या जाणा-या रस्त्याचे जागेचा मोबदला महापालिकेकडे जमा करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

२८. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (FICCI) या संस्थेमार्फत लॅडफिल गॅस-टू-एनर्जी या विषयावर आयोजित करण्यांत आलेल्या अभ्यास दौ-यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

२९. ठाणे रेल्वे स्थानक परिसर वाहतुक सुधारणा योजनेस मा.सर्वसाधारण सभेची सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

३०. दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृहातील व्यायामशाळेत अत्याधुनिक व्यायाम साहित्य बसविणेकरीता येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

३१. बी.एस.यु.पी.च्या बदललेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल -१ व २ यांस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

३२. प्रभाग क्र.४५ मधील कोर्टनाका ते पो.वसाहत क्र.३ ते सिव्हील हॉस्पिटलपर्यंत फुटपाथचे नुतनीकरण करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

३३. कापूरबावडी नाका ते बाळकुम नाका दरम्यान सर्व्हीस रस्त्याचे बांधकाम करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**(सौ. छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : १५.०४.२०१०

# <u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>

ठाणे महानगरपालिका सभा सूचना क्रमांक ०१, दि.०९/०४/२०१० अन्वये **मंगळवार दि.२०.०४.२०१०** रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसाठी सन्मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यादी खालील प्रमाणे -

**प्रश्न क्र.१ :-**

सन्मा.सदस्य श्री.व्ही सन्नी थॉमस् यांनी दि.०५.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. रॉयल प्लाझा चार माळयाची बिल्डींग ठाणे घोडबंदर रोड, सुरज वॉटर पार्क जवळ बांधण्यांत आली आहे. त्या बिल्डींगकरीता लागणारे बांधकाम मटेरियलवर किती कॉस्ट लावण्यांत आला?
२. तसेच इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रीक वस्तुवर किती कॉस्ट आकारण्यांत आला?
३. प्लाम्बिंग मटेरियलवर किती कॉस्ट लावण्यांत आला?
४. वरील सर्व बाबीवर किती कॉस्ट आकारण्यांत आला व त्यावर किती टक्के जकात आकारणी करण्यांत आली?
५. तसेच किती टक्के जकात वसुली करण्यांत आली व किती टक्के जकात वसुल करणे बाकी आहे?

**प्रश्न क्र.२ :-**

सन्मा.सदस्य श्री.सुरेश चंदू कांबळे यांनी दि.०८.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. रायलादेवी प्रभाग समिती अंतर्गत सद्यस्थितीत गेल्या सन २००८-०९, २००९-१० या कालावधीमध्ये किती अनधिकृत बांधकामे झाली?
२. किती अनधिकृत बांधकामावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यांत आली?
३. तसेच किती अनधिकृत बांधकामावर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल करण्यांत आले?
४. तसेच सद्यस्थितीमध्ये किती अनधिकृत बांधकामे प्रभागामध्ये चालू आहेत?
५. किती अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यांत आली त्या संबंधित बांधकामधारकांची नावे लेखी स्वरुपामध्ये मा.महासभेमध्ये देण्यांत यावीत.

**प्रश्न क्र.३ :-**

सन्मा.सदस्य श्री.जनार्दन कृष्णा खेतले यांनी दि.११.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. ठाणे महानगरपालिकेत किती कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता काम करतात. त्यापैकी कोणकोणत्या अभियंत्यांकडे कोणकोणती कामे सोपवण्यात आली आहेत. याबाबत प्रभाग समिती वाईज व मुख्यालया बाबत वेगवेगळी संपूर्ण माहिती मिळावी.
२. या अभियंत्यांची सेवा जेष्ठतेची, सेवा जेष्ठतेनुसार माहिती मिळावी. ज्या कोणकोणत्या उप अभियंत्यांकडे कार्यकारी अभियंत्यांची प्रभारी जबाबदारी देण्यांत आली आहे याची संपूर्ण माहिती मिळावी. सदर उप अभियंत्यांना प्रभारी जबाबदारी देण्यांत आली आहे. त्यांना जबाबदारी सोपवताना सेवा जेष्ठतेनुसार देण्यांत आले आहे कि कसे?
३. ठाणे महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात परिवहन समितीचे किती प्रवासी बस निवारा आहेत. त्यापैकी किती B.O.T. पध्दतीने देण्यांत आले व किती परिवहन समितीकडे आहेत? ते कोणकोणत्या संस्थांना भाडयाने देण्यांत आले आहेत. त्यांची निविदा कधी काढण्यांत आली होती व कार्यादेश कधी देण्यांत आले यापोटी किती रक्कम कोणकोणत्या तारखांना परिवहन समितीकडे जमा करण्यांत आली आहे. त्या निविदेबाबत संपूर्ण माहिती मिळावी. कोणकोणत्या संस्थेची किती रक्कम अजून जमा होणार आहे.
४. किती ठिकाणी नविन बस आगार बांधण्याची प्रक्रिया चालू आहे. (त्यांच्या कामाची विस्तृत माहिती मिळावी.) त्याची मुदत काय? त्या संस्थानबाबत केलेल्या करारनाम्याची व कार्यदेशाची प्रत या संपूर्ण प्रकरणाची इंत्यभू माहिती मिळावी.

**प्रश्न क्र.४ :-**

सन्मा.सदस्य श्री.राम पांडुरंग रेपाळे यांनी दि.१६.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. मे.सोल्युशन ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटींग व ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम यांच्या दरम्यान बस थांब्यावरील जाहिरात लावणे याकरीता झालेल्या करारनाम्यातील अटी आणि शर्तीनुसार सदर ठेकेदाराने परिवहन उपक्रमाला द्यावयाच्या ९ बसेस कर्जमुक्त झाल्या आहेत काय? सदर ठेकेदाराने सदर कर्जाची पुर्तता करुन त्याबाबत परिवहन उपक्रमाला कळविले आहे काय? ठेकेदाराने घेतलेल्या कर्जाची परतफेड परिवहन उपक्रम करणार आहे का? परिवहन उपक्रमाला केलेल्या आर्थिक फसवणूकीकरीता सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यांत आली?

२. करारनाम्यानुसार मे.सोल्युशन ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटींग कडून परिवहन उपक्रमाला मुदतीच्या काळात करावयाच्या सर्व बस स्टॉपची बांधणी अद्यापही का करण्यांत आली नाही? करारनाम्याची मुदत संपुष्टात आल्यानंतरही अद्याप नवीन बस थांब्याचे काम सुरु आहे. याबाबत परिवहन उपक्रमाने ठेकेदारावर काय कारवाई केली ? प्रारंभीचे बस थांबे विस्तृत स्वरुपाचे असावेत. कारण या ठिकाणी प्रवाशांची संख्या जास्त असते. असे असताना ठेकेदाराने मुलुंड रेल्वे स्थानकाजवळील उपक्रमाचे दोन्हीही मोठे बस थांबे काढून या ठिकाणी प्रवाशाची गैरसोय करणारा छोटा थांबा लावलेला आहे. यावर परिवहन उपक्रमातील अधिका-यांनी कोणती कारवाई केली? या ठिकाणी मोकळया झालेल्या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे याची उपक्रमाला जाणीव आहे काय? बस थांबे बनविणा-या कर्मचा-यांचे कामगारांच्या विम्याची कागदपत्रे परिवहन उपक्रमाकडे ठेकेदाराने सादर केली आहेत काय?

३. परिवहन उप व्यवस्थापक श्री.कमलाकर दिक्षीत, कर्मचारी व प्रशासन अधिकारी श्री.दामोदर नानकर, लेखापाल श्री.अजित नि-हाळी व वाहतुक अधिक्षक श्री.गुरुकुमार पेडणेकर यांच्यावर वाहन कर्ज प्रकरणी आर्थिक उपहाराचा गुन्हा का नोंदविण्यांत आला नाही? त्यांच्यावर फौजदारी कारवाई का करण्यांत आली नाही? परिवहन उपक्रमाच्या कर्जावर वाहने खरेदी करुन कर्जाची थकबाकी असतानाही वाहने विकणा-या सदर अधिका-यांवर आर्थिक फसवणूकीचा गुन्हा दाखल व्हावा.

**प्रश्न क्र.५ :-**

सन्मा.सदस्या ॲड. अनिता सुनिल गौरी यांनी दि.२२.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. खारीगांव येथील पारसिक बँक मागे सहज मित्र सोसायटी ही इमारत अधिकृत की अनधिकृत आहे? अनधिकृत असल्यास आतापर्यंत संबंधित विभागाने कोणत्या प्रकारची कारवाई केली?
२. सदरहू अनधिकृत इमारतीचे काम किती कालावधीत पूर्ण केले? सदरहू इमारतीच्या विकासकावर एमआरटीपी कायद्यान्वये कोणता गुन्हा दाखल करण्यांत आला? याबाबत माहिती देण्यांत यावी.
३. सदर बांधकामास ठाणे महानगरपालिकेतर्फे पाणीपुरवठा करण्यांत आला आहे का? असल्यास सदरहू अनधिकृत लाईन मंजूर कशी करण्यांत आली? कोणत्या कालावधीत मंजूरी देण्यात आली?

**प्रश्न क्र.६ :-**

सन्मा.सदस्य श्री.दशरथ पालांडे यांनी दि.२२.०३.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. मे.इंडियन स्मेल्टींग आणि रिफायनिंग कंपनी, पोखरण रोड नं.१, ठाणे या कंपनीच्या विकास प्रस्ताव क्र.९५०४१/टि.एम.सी./टि.डी.डी./६३०, दि.१७.०६.१९९६ अन्वये कामगार कॅन्टींग व लॅबारिटीचे बांधकाम झाले आहे का? व त्या ठिकाणी प्रस्तावानुसार कॅन्टीन लॅबोरिटी चालू आहे का?
२. सदरचे बांधकाम हे मंजूर विकास प्रस्तावानुसार नसल्याने यासंदर्भात संबंधित विभागाने आजपर्यंत कोणती कारवाई केली आहे का?
३. संपूर्ण कंपनीचे बांधकाम शहर विकास विभागाच्या परवानगीने व स्ट्रक्चरल डिझाईनप्रमाणे झाले आहे का? नसल्यास याबाबत कोणती कारवाई करण्यांत आली आहे?
४. मागील एक वर्षात प्रदुषण नियंत्रण विभागामार्फत कोणत्या प्रकारची कारवाई करण्यांत आली आहे का? असल्यास त्याची सविस्तर माहिती मिळावी.

**प्रश्न क्र.७:-**

सन्मा.सदस्य श्री.सुधीर बर्गे यांनी दि.०५.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. ठाणे महानगरपालिकेच्या एकात्मिक नाले विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र.१ मधील मागविण्यांत आलेल्या प्रत्येक निविदेमध्ये किती निवासी व किती बिगर निवासी नागरीकांचे पुनर्वसन करण्याचे सर्वेक्षणामध्ये नमूद करण्यांत आले आहे? त्या ठिकाणांची नांवे देण्यांत यावी. तसेच आजपर्यंत त्या ठिकाणी नाल्याचे बांधकाम करण्यांत आले आहे का? केले असल्यास कोणकोणत्या ठिकाणी? बाकी असल्यास त्या ठिकाणांची नांवे देण्यांत यावी.

२. ज्या संस्थांना या निविदेचे काम मिळाले होते त्या प्रत्येक संस्थेला आजपर्यंत किती देयक अदा करण्यांत आलेले आहे त्याची तारीख देण्यांत यावी. प्रत्येक निविदेवर कोणकोणत्या अधिका-यांची जबाबदारी होती त्यांची नांवे देण्यांत यावी. सदर निविदेमध्ये काम करण्यासाठी कोणत्या प्रकारची तरतूद करण्याची अट होती. त्याचे स्वरुप कोणते व सदरची कामे करताना जागेवरील परिस्थितीनुसार आवश्यक असलेले बदल तांत्रिक सल्लागार व वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार करण्यांत आलेले आहेत त्याची सविस्तर माहिती व बदल केलेल्या ठिकाणांची नांवे देण्यांत यावी.

३. प्रत्येक निविदेमधील झालेल्या कामांच्या ठिकाणांची नांवे, त्यांची लांबी, रुंदी किती व त्यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम किती? तसेच उर्वरित कामांची लांबी, रुंदी त्या ठिकाणांची नांवे व त्यासाठी येणा-या खर्चाची रक्कम किती? यापुढे या कामाकरीता सुधारीत आर्थिक वाढीव मंजुरी घेण्याची गरज आहे का? असल्यास किती?

४. सदर निविदेच्या कामाकरीता किती कालावधी देण्यांत आला होता व त्या कालावधीत काम झाले आहे का? तसेच बाकी असलेल्या कामासाठी कालावधी शिल्लक आहे का? तसेच त्या कामाची लायबिलीटी (हमी) मुदत किती वर्षाची होती. सद्यस्थितीत झालेले काम आज जागेवर त्या परिस्थितीत आहे का? याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

५. प्रत्येक निविदेच्या कार्यादेशाची साक्षांकित प्रत, नकाशाची प्रत व केंद्र शासनाने मेसर्स श्रीखंडे कन्सलटंट प्रा.लि.या तज्ञांमार्फत वेळोवेळी केलेल्या पाहणी अहवालाची प्रत तसेच महासभेने मंजुरी दिलेल्या ठरावाची व स्थायी समितीने केलेल्या ठरावाची प्रत देण्यांत यावी.

**प्रश्न क्र.८:-**

सन्मा.सदस्य श्री.प्रकाश राऊत यांनी दि.०६.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये विचारलेले प्रश्न खालीलप्रमाणे.

१. शहर विकास आराखडयातील उद्यानामध्ये राखीव क्षेत्रावर तसेच सी.आर.झेड-२ वर ३६० चौ.फुटाची नियमांचे उल्लंघन करणारी खोली बांधता येते काय?

२. उद्यानाची जागा कमी करुन बाळगोपाळांच्या खेळण्याचा अधिकारास बाधा आणून सुमारे ५०० चौ.फुटाची जमिन गिळंकृत करण्यासाठी खाजगी संस्थेला घाईगर्दीने भाडेतत्वावर देता येते काय?

३. सदर उद्यान बाळगोपाळांच्या खेळण्यासाठी अपुरे पडत असल्याने सदर खोलीचा करारनामा रद्द करता येईल काय? सदर बेकायदेशीर खोली जमिनदोस्त करुन बालोद्यानाचा विस्तार करता येईल काय?

४. सदर उद्यानातील खाजगी जमिनीवरील खोली वंदे मातरम् संस्थेस घाईगर्दीने साध्या करारावर रजिस्टर करारनामा न करता देणे कायदेशीर होईल काय?

५. सदर खोलीस पाणी, विद्युत कनेक्शन कायदेशीररित्या घेण्यांत आली आहेत काय? त्याची तपशीलवार माहिती देणे आवश्यक आहे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ०९/०४/२०१०.

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# <u>ठाणे महानगरपालिका, ठाणे.</u>

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०४/२०१०

## <u>ठाणे महानगरपालिकेच्या खंडीत सर्वसाधारण सभेचे परिपत्रक</u>

प्रति,
**सन्मा.श्री./श्रीमती-------------------------**
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, सभा सूचना क्रमांक १, दि.११/०४/२०१० अन्वये मंगळवार दि.२०/०४/२०१० रोजी बोलाविण्यांत आलेली सभा खंडीत झाल्याने सदरहू सभा **वार दि.००/०४/२०१० रोजी सकाळी ठिक ११.३० वा. ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न" डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात** बोलाविण्यांत येत आहे.

सदर सभेत सभा सूचना क्रमांक १, दिनांक ११/०४/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचारविनिमय करण्यांत येईल.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**<u>मा.महापौर महोदय यांचे मंजूरीने.....</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २०/०४/२०१०.

(**सौ.छाया मानकर**)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २०.०४.२०१०

**ठाणे महानगरपालिकेच्या मंगळवार दि.२०.०४.२०१० रोजी होणा-या मा.महासभेसाठी आयत्यावेळेच्या विषयांची यादी.**

१. प्रभाग क्र.५९ मधील राजश्री मित्र मंडळ येथील चौकास कै.केशव (नाना) बाबुराव कोळी चौक असे नामकरण करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

२. प्रभाग क्र.८७ प्र.ठाकरे मार्गाच्या शासकीय गोदाम ते चक्की नाला दरम्यानच्या पदपथाची पुनर्बांधणी करणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

३. प्र.क्र.१०७ मधील महाराजा कॉर्नर ते सहारा अपार्ट.पर्यंत नाला बांधणेच्या कामासाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

४. प्र.क्र.५१ मध्ये मनोगत बिल्डींग परिसरातील जुने शौचालय तोडून त्या ठिकाणी वृध्दांना बसण्यासाठी आसन व्यवस्था करणेकरीता येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

५. रायलादेवी प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ मध्ये झांजेनगर परिसर दरम्यान डिसोझा चाळ येथील नाल्यालगत नव्याने सार्वजनिक शौचालय बांधणेकरीता येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

६. ठाणे महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकरीता १ नग कॉपी प्रिंटर मशिन व २ नग हायस्पिड झेरॉक्स मशिन खरेदी जुन्या बंद मशिन्स बायबॅकने देऊन करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

दिनांक :- २०.०४.२०१०